# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क. ४९३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१०/०८/२०१६.

## १) मोटार सायकलची धडक,एक जखमी . :–

दिनांक ०९/०८/२०१६ रोजी १९.१५ वा. दर. फिर्यादी दिगंबर विठठलराव ठवकर वय ४० वर्ष रा. पिपरी हा पिपरी पुर्नवसन पानठेल्यावर बसला असतांना फिर्यादीचे घरा समोरील विठठल विपीन कारेमोरे वय ३३ वर्ष हा सायकलने घराकडे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताबेतील मोटार सायकल क्र.एमएच ३१ एल ८३७९ हयगयीने,निष्काळजीपने चालवुन सायकलस्वार यास मागेहुन धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

## २) मोटार सायकलची धडक,एक गंभिर जखमी . :–

दिनांक ०९/०७/२०१६ रोजी १९.४५ वा. दर. यातील अज्ञात आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने, भरधाव वेगाने चालवुन मोटार सायकल क्र. एमएच ३६/२६१८ वर बसलेले २ इसम व मोटार सायकल क्र.एमएच ३५ टी ८५५१ चा चालकास समोरून धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची माहीती न देता पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी राऊत यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादंवि सहकलम १८४,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

## ३) लोकसेवक पदाचा गैरवापर करतांना मिळुण आल्याने गुन्हा दाखल. :–

दिनांक १०/०६/२०१६ रोजी १७.३४ वा. ते २८.२१ वा. दर. ते ०५/०८/२०१६ पर्यत यातील आरोपी यांनी त्याचे लोकसेवक पदाचा स्वत:चे आर्थीक लाभाकरीता गैरवापर करून तक्रारदार अब्दुलवाहीद अब्दुल जफार याने अवैद्यरेती वाहतुक करतांना मिळालेला ट्रक सोडविण्याची नगदी २५,०००/–रू. ची लाच स्विकारण्याची तयारी दर्शवीली व तक्रारदाराचे १० रेतीचे ट्रकचा प्रत्येकी २,०००/–रू. महीणा हफ्याची मागणी केल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. शेटे एसीबी नागपुर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ७ ला.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. शेटे एसिबी नागपुर हे करीत आहेत.

३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक १०/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ० केस, तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस व इतर वाहनांवरती १११ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.